नागपूर सुधार प्रन्यास
मेट्रो विभाग

नागपूर सुधार प्रन्यास सांस्कृतिक संकुल, तिसरा माळा, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर:४४० ०३३

क्रमांक : का.अभि.(मेट्रो)/स.अभि.–१/४९६७ नागपूर, दिनांक २९/०४/२०१६.

प्रति,

जिल्हाधिकारी,
नागपूर.

विषय :– मौजा पेवठा खसरा क्रमांक ७८, आराजी ६०,१००.०० चौ.मी. (६.०१ हे.आर.) जागा, प.ह.नं. ४०–अ, तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर या जागेस निवासी वापरास अकृषक परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :– १. अर्जदाराचा दिनांक ०५.०५.२०१२ रोजीचा अर्ज.
२. शासन निर्णय क्र. एनएपी–२०१६/म.अ.७/टी–१, दि. २२/०१/२०१६

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा **निवासी वापरार्थ** अकृषक करणेप्रकरणी अभिन्यास मंजूरीचे प्रकरण संदर्भांकित अर्जान्वये प्राप्त झाले आहे.

अंतिम प्रादेशिक योजना नागपूर प्रदेशच्या प्रावधानानुसार उक्त जागा प्रभाग क्षेत्राबाहेर असून कृषी उपयोगाने प्रस्तावित आहे. तथापी शासन अधिसूचना दिनांक १८/०१/२०१२ नुसार अटीनिहाय सदर जागा कृषी क्षेत्रातून वगळून निवासी क्षेत्रात अंर्तभूत केली आहे. नागपूर महानगर क्षेत्राकरिता दिनांक २०/०२/२०१५ ला प्रसिध्द झालेल्या प्रारूप विकास योजनेत उक्त जागा **कृषी–२** या उपयोगाने प्रस्तावित आहे. शासन पत्र दिनांक ११/०१/२०१६ नुसार तात्पुरते मंजूर रेखांकने अशा विकास प्रस्तावाना पूर्व बांधलकी म्हणून पुढील परवानगी क्रम प्राप्त राहील.

संदर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणाच्या अभिन्यासाला मा. सभापती नागपूर सुधार प्रन्यास यांनी दिनांक **१५.०४.२०१६** रोजी **अंतिम मंजूरी** प्रदान केलेली आहे. उक्त जागेला फक्त **निवासी** वापराकरीता अकृषक करण्याकरीता **अंतिम मंजुरीची** खालील अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त "**निवासी**" वापराकरिताच करण्यात यावा तसेच भविष्यात भूखंडकाचे विभाजन करू नये.
२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.
३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.
४. "सार्वजनिक सोयी व सुविधा" करिता प्रस्तावित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रफळ एकुण क्षेत्रफळाच्या १५% पेक्षा कमी असु नयें.
५. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.
६. विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.
७. सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास त्यावेळी प्रचलित असलेली विकास नियंत्रण नियमावली लागू राहील.
८. विषयांकित जागेलगत/जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/जलसिंचन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

९. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१०.अभिन्यासातील रस्ते योग्य प्रकारे विकसीत करून संबधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील.

११.जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

१२.अभिन्यासातील रहिवाशासांठी पिण्यायोग्य पाण्याची मुबलक प्रमाणात सोय करून तसेच उपलब्ध पाणी पिण्यायोग्य नसल्यास आवश्यक सर्व प्रक्रिया पुर्ण करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चें खर्चाने करणे आवश्यक राहील.

१३.अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (*Black & Grey Water*) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशींग, फिश पॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) नासुप्रच्या विश्वस्त मंडळाच्या ठराव क्र. २७/१०९२ च्या प्रावधानांनुसार सांडपाणी व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

१४.अभिन्यासास थेट पोहच म्हणून लगतच्या खसरा क्रामंक ७७, मौजा पेवठा या जागेतून १५.० मी. रूंद रस्ता जमीन मालक/विकास यांनी स्वत:च्या खर्चाने विकसीत करणे आवश्यक राहील.

१५.अभिन्यासास अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर नागपूर सुधार प्रन्यास सोबत विकास करारनामा करणे बंधनकारक राहील.

१६.अभिन्यासातील रस्ते, मलवाहिका, पावसाळी पाण्याची नलिका, जल वाहिनी, स्ट्रीट लाईट इत्यादि योग्य प्रकारे विकसीत करून ती संबंधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील. जेव्हा पर्यन्त विकास कामे ग्रामपंचायतीस हस्तांतरित होत नाही तेव्हा पर्यन्त जमीन मालकाने देखभाल दुरूस्तीची कामे करावी लागेल.

१७.विषयांकित जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे विशेष नियोजन प्राधिकरण कडून मंजूर करून घ्यावे लागेल.

अभिन्यासाची दोन प्रत या कार्यालयामार्फत यासह पाठविण्यात येत आहेत. कृपया उक्त जागेची अकृषक करनिर्धारण प्राप्त झाल्यानंतर अकृषक आदेशाची प्रत या कार्यालंयास पाठविण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : १. अभिन्यास नकाशा दोन प्रत
(मौजा पेवठा खसरा क्रमांक ७८, तह. नागपूर ग्रा.)

S.P. Parsodkar

कार्यकारी अभियंता (मेट्रो)
नागपूर सुधार प्रन्यास

प्रतिलिपी :

१. तहसिलदार, तहसील कार्यालय नागपूर (ग्रामीण),सिव्हील लाईन्स, नागपूर यांना करनिर्धारण करण्याकरिता सादर.

२. श्री पंकज गोविंदराव दगडे व इतर, रा. पेवठा, तह. नागपूर ग्रामीण, नागपूर